# खारफुटीच्या पंढरीला जागतिक झळाळी!

## गोदरेजचा उपक्रम : पर्यावरणासाठी अंथरला हिरवा गालिचा

भगवान मंडलिक

**खारफुटीचे जंगल म्हणजे मुंबईचा प्राणवायू. या जंगलाला जागतिक दर्जा देण्याचा प्रयत्न विक्रोळीच्या सोनाबाई फिरोजशा गोदरेज मरीन इकोलॉजी सेंटरचे अधिकारी करीत आहेत...**

डोंबिवली : मुंबईतील अठराशे एकर जमिनीवर खारफुटीचे जंगल आहे, यावर कोणाचा विश्वास बसणार नाही. विशेष म्हणजे हे जंगल बिल्डरांच्या नजरेपासून कोसो दूर आहे. नवी मुंबई, मुंबई आणि ठाणे खाडीच्या मधल्या पट्ट्यात असणारे खारफुटीचे हे जंगल म्हणजे मुंबईचा प्राणवायू आहे. या खारफुटीच्या जंगलाला जागतिक दर्जा देण्याचा प्रयत्न या जंगलाची लहान बाळाप्रमाणे काळजी घेणाऱ्या विक्रोळीच्या सोनाबाई फिरोजशा गोदरेज मरीन इकोलॉजी सेंटरचे अधिकारी व कर्मचारी करीत आहेत.

सेंटरच्या कार्यकारी अधिकारी डॉ. माया महाजन आणि शैक्षणिक प्रकल्प अधिकारी हेमंत कारखानीस यांच्या मार्गदर्शनाखाली खारफुटीचे जंगल आंतरराष्ट्रीय पातळीवर नेण्याचे जोरदार प्रयत्न सुरू आहेत. या खारफुटीच्या जंगलात हाँगकाँग, सिंगापूर, सुंदरबन, भरतपूर आदी राखीव जंगलांमध्ये ज्या सुविधा देण्यात आल्या आहेत त्या येथे देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. अधिकाधिक नागरिकांना खारफुटीविषयी माहिती व्हावी, या जंगलाचे महत्त्व समजावे, आतापर्यंत पुस्तकांतील धड्यांतून मिळणारी खारफुटीची माहिती प्रत्यक्ष बारकाईने पाहता यावी आणि नागरिकांत जागृती निर्माण व्हावी या हेतूने गोदरेज मरीन इकॉलॉजी सेंटरला आंतरराष्ट्रीय पातळीवर नेऊन जनमानसात रुजविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे, असे डॉ. माया महाजन यांनी सांगितले.

अधिकाधिक शाळकरी विद्यार्थी व नागरिकांना अठराशे एकरावरील खारफुटीच्या जंगलांचा धांडोळा घेता यावा यासाठी गोदरेज सेंटरच्या 'खारफुटी जंगलात तरंगते रस्ते, तळी, पक्ष्यांची माहिती देणारे फलक, चित्रांतून खारफुटीचे दर्शन, शिल्पाकृती आदी साकार करण्यात येणार आहेत. याद्वारे खारफुटीचे जतन करून या अत्याधुनिक सुविधा खारफुटीच्या जंगलात देण्यात येणार आहेत, असे महाजन यांनी सांगितले.

१९४० मध्ये गोदरेज ॲण्ड बॉयस मॅन्युफॅक्चरिंग कंपनीचे संचालक नौरोजी फिरोजशा यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या कोर्ट रिसीव्हरकडून बाराशे हेक्टर जमीन लिलावबोलीने खरेदी केली. या जमिनीपैकी ६०० हेक्टर जमीन विकास आराखड्यात 'हरितपट्टा' म्हणून राखीव ठेवण्यात आली. ६० ते ७० वर्षांपूर्वी सीआरझेड व खारफुटीच्या जंगलांविषयी कोणतीही चर्चा नव्हती. त्या काळात गोदरेज समूहाने खारफुटीचे महत्त्व ओळखले होते हे विशेष, असे महाजन म्हणाले. या सेंटरवर यापूर्वी डॉ. सलीम अली, डॉ. ए. के. गांगुली, डॉ. एच. एन. सेठना यांनी काम केले आहे.

खारफुटीच्या जंगलाला सिमेंटच्या जंगलाची बाधा होऊ नये, याची सेंटरतर्फे पूर्णपणे काळजी घेतली जाते. चारही दिशांना उंच मनोऱ्यांवर सुरक्षा रक्षक पाळीव कुत्र्यांसह जंगलाचे रक्षण करतात. सेंटरची परवानगी घेतल्याशिवाय कोणालाही खारफुटीच्या जंगलात प्रवेश दिला जात नाही, असे हेमंत कारखानीस यांनी सांगितले. खारफुटीचे जंगल, पशुपक्षी आणि माशांची तळी यांच्या रक्षणाबरोबरच खाडीवर येणाऱ्या परदेशी पाहुण्यांचे स्वागत केले जाते. जंगलात सेंटरतर्फे खारफुटीला झळाळी देणारे अनेक नैसर्गिक उपक्रम राबविले जात आहेत. डॉ. महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली नऊ कर्मचाऱ्यांचा चमू हे काम करीत आहे.



**खारफुटीच्या जंगलाची काळजी घेणाऱ्या डॉ. माया महाजन आणि हेमंत कारखानीस.**

### आवाहन...

खारफुटीची माहिती देणारे सुमारे दीडशे कार्यक्रम आतापर्यंत गोदरेज मरीन इकॉलॉजी सेंटरने राबविले आहेत. या उपक्रमात आजवर हजारो विद्यार्थी, अभ्यासक व संशोधक सहभागी झाले. सुमारे ३० हजार नागरिकांनी आतापर्यंत गोदरेजमधील खारफुटीच्या जंगलाला भेट दिली आहे.

शाळांनी आपल्या सहली या जंगलात काढून विद्यार्थ्यांना या खारफुटीविषयी जागरूक करावे. स्वयंसेवी संस्था, सामाजिक संस्था व ज्येष्ठ नागरिकांनी सेंटरच्या उपक्रमात सहभागी होऊन खारफुटीविषयी जनजागृती करावी, असे आवाहन सेंटरतर्फे करण्यात आले आहे. संपर्क : (९५२२) ६७९६२०७७